# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट-२९६/२०२२** **दिनांक : ०३/१०/२०२२**

## अपघात टाळण्यासाठी वाहतूक पोलीसांचे वतीने ब्लॅकस्पॉट निश्चित करुन जनजागृती

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील रहदारीचे प्रमाण व अपघातांची संख्या लक्षात घेवून मागील ३ वर्षामध्ये एकाच ठिकाणी होत असलेल्या अपघातांच्या ठिकाणांची माहिती काढून वाहतूक पोलीसांनी १६ ब्लॅकस्पॉट म्हणून निश्चीत केले आहे. उपरोक्त १६ ठिकाणांपैकी काशिमिरा-उत्तन रोडवरील हाडकेश व प्लेझंट पार्क येथे अपघातांची संख्या जास्त असल्याने त्याठिकाणी वेगमर्यादा, अपघातप्रवण स्थळाचे बोर्ड तसेच इतर प्रकारच्या कायमस्वरुपी उपाययोजना केल्याने सदर ठिकाणी होणाऱ्या अपघातांची संख्या कमी झालेली आहे. त्याचप्रमाणे मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त वाहतूक नियमनाकरिता व जनजागृती व्हावी याकरिता घोडबंदर रोड, फाउंटन, वसई-विरार या भागातील अपघात प्रवण ठिकाणी वाहतूक पोलीसांचे वतीने चालकांना स्पष्टपणे नजरेस पडेल असे सुचना व सावधनतेबाबत फलक लावण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे मिरा-भाईंदर,वसई-विरार वाहतूक पोलीसांनी 'इच वन, टिच वन' या नावाची व्हिडीओ क्लीप तयार करुन समाजमाध्यमांद्वारे वाहतूक नियमनाबाबत अत्यंत उत्कृष्टरित्या जनजागृती करण्याचे प्रयत्न केलेले आहे. वाहतूक पोलीसांच्या वतीने सुचना फलक लावण्यात आलेल्या ठिकाणी आज दिनांक ३/१०/२०२२ रोजी मा. खासदार श्री. राजेंद्र गावीत व श्री विजयकांत सागर, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) यांनी भेटी दिलेल्या आहेत.


सावधान !
ALERT !
BLACK SPOT
मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय


सावधान !
ALERT !
BLACK SPOT
मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय
OPPO F9 Pro